सकाळ



**निपाणी : नवाज गफार कडगी यांना २५ हजारांची मदत देताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, शाखाध्यक्ष प्राचार्य पी. एम. हेरेकर, शाखा सल्लागार आदी.**

# सभासदाला 'रवळनाथ'ची मदत

**निपाणी :** रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील कर्जदार सभासद नवाज गफार कडगी यांना संस्थेतर्फे २५ हजारांची आर्थिक मदत देण्यात आली. येथील पी. बी. रोडलगतच्या शिंत्रे कॉलनीतील तीन दुकानांना आग लागली होती. त्यात नवाज गफार कडगी यांचे 'आयर्न अ‍ॅण्ड स्टील वर्क्स' हे दुकान भस्मसात झाले. त्याची माहिती समजताच 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व सहकाऱ्यांनी कडगी यांची भेट घेतली. मानसिक आधारासह भरीव आर्थिक मदत दिल्यामुळे कडगी कुटुंबिय भारावून गेले. यावेळी रवळनाथ''चे संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, महेश मजती, सीइओ दत्तात्रय मायदेव, निपाणी शाखा अध्यक्ष, प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर, माजी शाखा सल्लागार रावसाहेब जनवाडे, प्रशासन अधिकारी सागर माने, शाखाधिकारी उत्तम दळवी, कुमार तोंदले, अजित माने, सुनील पाटील यांच्यासह सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

Belgaum, Nipani-Today
07/12/2022 Page No. 3